स्थापना वर्ष -१९९८

फोन (०२३८१) २२६०७३

शासन मान्यता क्रमांक - एनजीसी-३५९८

श्री स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय विकास मंडळ,नळेगाव द्वारा संचलित

# शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव

**ता. चाकूर जि. लातूर ४१३ ५२४**

(संलग्नित-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड)

| अध्यक्ष | सचिव | प्राचार्य |
|---|---|---|
| श्री बब्रुवान माणिकराव जाधव | श्री सताळकर विश्वनाथ बसवंतप्पा | डॉ.संजय ज्ञानोबा वाघमारे |
| ९९२३९६८९४९ | ९४०३०१३४९५ | ९४२३३४७४१९ |


**जा.क्र./शिवमन/करार/२०१७-२०१८/२९६३** **दिनांक : १९/०६/२०१७**

प्रति,

*मा.समन्वयक,*

*आम्ही नळेगावकर ग्रुप, नळेगाव.*

*ता.चाकूर जि. लातूर*

*विषय :- सामंजस्य करार (एम.ओ.यु.) बाबत.*

*महोदय,*

*वरील विषयी विनंती की, आमच्या **शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव** ता.चाकूर जि. लातूर येथील पर्यावरण व परिसर संवर्धन समितीच्या माध्यमातून वृक्षारोपण तसेच पर्यावरण व परिसर संवर्धनाचे कार्यक्रम राबविले जातात. आपणही सदरील कार्यक्रमाशी जोडलेले असल्याने आमचे महाविद्यालय व आपला ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करता यावे. व पर्यावरण संवर्धन आणि परिसर संवर्धनाचे व वृक्षारोपनाचे कार्य करता यावे, यासाठी आम्ही आपल्या **'आम्ही नळेगावकर'** ग्रुपसोबत सामंजस्य करार करीत आहोत.*

*तरी आपण प्रस्तूत **सामंजस्य करार (MOU)** साठी मान्यता प्रदान करुन आवश्यक तेथे सहकार्य करावे ही विनंती.*

*सहकार्याची अपेक्षा. धन्यवाद !*

SHIVJAGRUTI SR. COLLEGE OFFICE Nalegaon, Dist. Latur

*आपला विश्वासू,*

PRINCIPAL
Shivjagruti Sr. College, Nalegaon
Tq. Chakur, Dist. Latur

SHIVJAGRUTI SR. COLLEGE OFFICE Nalegaon Dist. Latur

PRINCIPAL
Shivjagruti Senior College
Nalegaon, Dist Latur-413524

Scanned with OKEN Scanner

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

रु. 100

ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA 2018 — गांधी फौंडेशन, जळगांव. TS 864860

(अनुच्छेद ४)

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव व रहिवाशी पत्ता- अमोल अरुण पगार. नळे. द्वारा. प्राचार्य शिवजागृती महा. वि.

मुद्रांक विक्री नोंद वही अनु. क्रमांक/दिनांक ९३६ | ०३.१०.१८. नळेगांव

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही [signature]

परवानाधारक मुद्रांक विक्रेत्याची सही [signature]

परवानाधारक मुद्रांक विक्रेत्याचे ठिकाण/पत्ता-

मुद्रांक विक्रेता नळेगाव

ता. चाकूर जि. लातूर ... क्र. ३००४/२००४

मुद्रांक पुरवठा दिनांक 24 AUG 2018 उपकोषागार अधिकारी, चाकूर

# Memorandum of Understanding

Between

Shivjagruti Senior College, Nalegaon Dist. Latur

(Party no.1)

And

Gandhi Research Foundation,Jalgaon

(Party No.2)

The Memorandum of Understanding is entered in to on **October- 2018** between:

1. **Shivjagurit Senior College, Nalegaon Dist. Latur** an educational institute established in August 1998.

**And**

Scanned with OKEN Scanner

2. **Gandhi Research Foundation (GRF)**,an international institution registered as a non-profit social organization, foundation by Dr. Bhavarlal H. Jain on April 10,2007,and functioning from Gandhi Treerth, Jain, Hills, Sirsoil Road, Jalgaon, India. The GRF is guided by the vision "to preserve for posterity the profound legacy of Mahatmas Gandhi's life, through and work", and its mission is summed up as "striving to help establish a world founded on Truth, ahimsa, peaceful co- existence, conservation and love for labour".

3. I. **Objectives:**

a. Creating awareness about the thoughts of Mahatma Gandhi among the Society. Teachers & students of Shivjagruti Senior College, Nalegaon Dist. Latur.

b. Training, study and research on nonviolence, peace, justice and an ecofriendly life style.

II. Collaboration for –

a. Gandhi Vichar Sanskar Exam and Development of Gandhi Adhyasan Kendra.

b. Development of Historical museum

c. Guest Lectures

d. Historical Exhibitions

e. Exchange of Historical document

f. To Conduct Lecture series, Seminars etc.

g. Any other relevant activities.

***Signed By***

Party No.1

Principal

PRINCIPAL
Shivjagruti Sr. College, Nalegaon
Tq. Chakur, Dist. Latur

On Behalf of

Shivjagruti Senior College Nalegaon .

Party No. 2

Coordinator

JAIN IRRIGATION SYSTEMS LTD
Jain Agri Park,Jain Hills,P.O.Box:72
JALGAON-425001.India
☎:(0257)260011/22
Fax:(0257)261111/33

On behalf of

Gandhi Research Foundation ,Jalgaon

Scanned with OKEN Scanner

**डॉ. सोमनाथ रोडे**
एम.ए. पीएच.डी., एलएल.बी.

**सौ. व्रजमाला रोडे**
एम.ए.बी.एड.

'प्रयाग' ४, शारदा नगर, अंबाजोगाई रोड, लातूर - ४१३ ५३१ (महाराष्ट्र)
फोन : (०२३८२) ~~२२०४५५~~ 202020 मो 7517985690

---

संदर्भ : 　　　　　　　　　　　　　　　　दिनांक : 27/08/2021

प्रति

प्राचार्य

मा. डॉ. संजय वाघमारे,

शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

स.न.वि.वि.

या पत्रासोबत श्री बजरंग सोनावणे, युवा सेल संयोजक, सर्व सेवा संघ (अखिल भारत सर्वोदय मंडळ, सेवाग्राम आश्रम, ग्राम- वर्धा) यांचे पत्र सोबत जोडत आहे. सेवाग्राम - वर्धा येथे दि. 20 ते 24 सप्टेंबर 2021 मध्ये जयप्रकाश नारायण यांच्या कालावधीत गांधी- विनोबा व जयप्रकाश नारायण यांना अभिप्रेत असलेल्या शैक्षणिक, सामाजिक आणि रचनात्मक कार्याला समोर ठेवून युवक शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराच्या कालावधीत निवास- भोजनाची व्यवस्था आयोजकांतर्फे करण्यात आलेली आहे. शिबिरार्थी युवा कार्यकर्त्यांच्या प्रवास खर्चाची व्यवस्था महाविद्यालयामार्फत व्हावी, ही अपेक्षा आहे.

कृपया आपण आपल्या महाविद्यालयातून एक युवक आणि एक युवती यांची निवड करून ती नावे श्री बजरंग सोनावणे यांच्याकडे त्वरीत पाठवून द्यावीत. शिबिर केंद्रीय असून तपशील पत्रात नमूद केला आहे. आपणास विनंती की ही गोष्ट कृपया कार्यान्वित करावी, ही विनंती.

पत्ता- श्री बजरंग सोनावणे,
युवा सेल संयोजक
सर्व सेवा संघ,
महादेवभाई भवन, सेवाग्राम-
वर्धा - PIN 442102, Ph. 07152 - 254061 व 254091.

आपला विश्वासू
[signature]
(सोमनाथ रोडे)
विश्वस्त सर्व सेवा संघ सेवाग्राम

श्री डॉ. O.V. लिगाडे
गांधी अध्यासन कडून
2 विद्यार्थी पाठविण्यात यावेत.
[signature]
28-08-21

PRINCIPAL
Shivjagruti Senior College
Nalegaon, Dist. Latur-413524

SHIVJAGRUTI SR. COLLEGE
OFFICE
Nalegaon, Dist. Latur

# सर्व सेवा संघ
(अखिल भारत सर्वोदय मंडल)

# SARVA SEVA SANGH
(Akhil Bharat Sarvodaya Mandal)

महादेवभाई भवन, सेवाग्राम, वर्धा-442102 (महाराष्ट्र)
Mahadevbhai Bhavan, Sevagram, Wardha - 442102 (Maharashtra)
Phone No. 07152 - 284081, 284021 | FAX : 284152
E-mail : sarvasevasangh@yahoo.in / sarvasevasangh@hotmail.com / sarvaseva.sarvodaya@gmail.com


क्रमांक : बी/20/1019/2021-22 — दिनांक : 16 अगस्त 2021

**<u>सभी प्रदेश सर्वोदय मंडल के अध्यक्षों और युवा सेल प्रभारियों की सेवा में</u>**

**विषय : <u>राष्ट्रीय युवा प्रशिक्षण शिविर, सेवाग्राम, जि.वर्धा का आमंत्रण</u>।**

महोदय,

सर्व सेवा संघ के युवा सेल द्वारा महात्मा गांधी के सेवाग्राम आश्रम, जि.वर्धा (महाराष्ट्र) में आयोजित 4 दिवसीय राष्ट्रीय युवा प्रशिक्षण शिविर का आमंत्रण भेजते हुए हम अत्यंत हर्षित हैं। यह शिविर <u>दिनांक 20 सितंबर 2021 को सुबह 10.00 बजे शुरू होगा और दिनांक 24 सितंबर 2021 को दोपहर तक चलेगा</u>।

शिविर में गांधी, विनोबा, जयप्रकाश के विचार चिंतन के साथ-साथ मौजूदा राष्ट्रीय-अंतर्राष्ट्रीय परिस्थितियों की समझ और उनके अहिंसक समाधान के बारे में अभ्यास कराया जायेगा। शिविर के दौरान सेवाग्राम आश्रम और वर्धा स्थित विभिन्न रचनात्मक संस्थाओं का शैक्षणिक भ्रमण भी रखा जाएगा।

इस सम्बन्ध में आपसे निम्नलिखित अनुरोध है –

1. आप अपने राज्य से अधिकतम 5 से 7 शिविरार्थी भेजने का कष्ट करें। जिसमें आधी संख्या लड़कियों की होनी चाहिए।
2. शिविरार्थियों की उम्र 18 से 30 वर्ष के बीच होनी चाहिए।
3. शिविरार्थी शिविर शुरू होने के एक दिन पूर्व दिनांक 19 सितंबर 2021 की शाम तक अथवा शिविर शुरू होने की तारीख 20 सितंबर की सुबह तक अवश्य पहुंचे और शिविर प्रारंभ होने के बाद ही आगमन का रजिस्ट्रेशन कराएं।
4. शिविर में आने वाले सभी युवा कम-से-कम महात्मा गांधी की आत्मकथा यह किताब पढ़कर अवश्य आएं।
5. शिविरार्थी अपने साथ नोटबुक, कलम, अपने पहनने ओढ़ने के कपड़े, जरूरी दवाइयां साथ लाएं।
6. शिविर में शामिल होने वाले प्रतिभागियों को अपने प्रवास के खर्च स्वयं वहन करना होगा। शिविर में निवास व भोजन आदि खर्च सर्व सेवा संघ द्वारा किया जायेगा.

आपसे अनुरोध है कि राष्ट्रीय युवा प्रशिक्षण शिविर की सफलता के लिए उपरोक्तानुसार अपना सहयोग प्रदान करें। आशा है आप स्वस्थ व प्रसन्न होंगे। शुभकामनाओं सहित,

विनीत,

- बजरंग सोनावणे
युवा सेल संयोजक, सर्व सेवा संघ


SHIVJAGRUTI SR. COLLEGE
OFFICE
Nalegaon, Dist. Latur


Scanned with OKEN Scanner

1

दि. 15.09.2021

प्रति,
मा० प्राचार्य,
शिवजागृती महाविद्यालय
नळेगांव

विषय - प्रवास खर्चासाठी रक्कम मिळणे बाबत.

महोदय,

वरील विषयी विनंती की दि. 20 ते 24 सप्टेंबर 2021 दरम्यान सेवाग्राम (जि-वर्धा) येथे होत असलेल्या शिबीरासाठी आपल्या महाविद्यालयातील गांधी अध्यासन केंद्राच्या वतीने आम्हा दोघांना सहभागी प्रतिनिधी म्हणून पाठविण्यात येत आहे.

तरी वरील शिबीरात सहभागी होण्यासाठी आम्हा दोघांना प्रवास खर्चासाठी रु. 3200/- देवून सहकार्य करावे. ही विनंती.

आपले आज्ञाधारक

1) सावंत गणेश राजेंद्र (Sawant)
2) हुडगे विशाल राजकुमार

मा. प्राचार्य साहेबांना विनंती की, वरील खर्चास मान्यता द्यावी.
(डॉ. प्रकाश
15.09.21
(संचालक GAK)

श्री कुलकर्णी
मान्यता देण्यात येते.
15.09.21

SHIVJAGRUTI SR. COLLEGE OFFICE Nalegaon, Dist. Latur

PRINCIPAL
Shivjagruti Senior College
Nalegaon, Dist. Latur-413524

Scanned with OKEN Scanner

# Sarva Seva Sangha

(Akhil Bharat Sarvodaya Mandal, Sevagram, Dist. Wardha.)

## CERTIFICATE

*Certified that*

*Name* Hudge Vishal Rajkumar

*of* Shivjagruti senior College, Nalegaon.

**is being felicitated as the Best Participant of the youth camp at Sevagram Ashram Pratishthan Dated 20th to 24th September 2021 for his / her sterling Character qualities.**

**He/ She has behaved extraordinarily well with Organisers and Participant of the Sarva Seva Sangha throughout the camp**

**We Wish him / her all success and a bright future.**

SHIVJAGRUTI SR. COLLEGE OFFICE Nalegaon, Dist. Latur

PRINCIPAL
Shivjagruti Senior College
Nalegaon, Dist. Latur-413524

| **Convenor** | **President** | **President** |
|---|---|---|
| **Youth Cell** | **Sevagram Ashram Pratishthan** | **Sarva Seva Sangha.** |

Scanned with OKEN Scanner

# Sarva Seva Sangha

(Akhil Bharat Sarvodaya Mandal, Sevagram, Dist. Wardha.)

## CERTIFICATE

Certified that

Name : Sawant Ganesh Rajendra

of Shivjagruti Senior College, Nalegaon

is being felicitated as the Best Participant of the youth camp at Sevagram Ashram Pratishthan Dated 20th to 24th September 2021 for his / her sterling Character qualities.

He/ She has behaved extraordinarily well with Organisers and Participant of the Sarva Seva Sangha throughout the camp

We Wish him / her all success and a bright future.

SHIVJAGRUTI SR. COLLEGE OFFICE Nalegaon, Dist. Latur

PRINCIPAL
Shivjagruti Senior College
Nalegaon, Dist. Latur 413521

| Convenor<br>Youth Cell | President<br>Sevagram Ashram Pratishthan | President<br>Sarva Seva Sangha. |
|---|---|---|

Scanned with OKEN Scanner

# गांधी रिसर्च फाउण्डेशन

२२ ऑक्टोबर २०२१


संस्थापक
भवरलाल एच. जैन

चेअरमन
डॉ. अनिल पी. काकोडकर

संचालक
डॉ. डी. आर. मेहता
अशोक बी. जैन
दलिचंद एच. ओसवाल
डॉ. सुदर्शन आयंगार
अनिल बी. जैन
ज्योती ए. जैन
तुषार ए. गांधी

सल्लागार समिती
के. बी. ठक्कर
राधाबहन भट
डॉ. भालचंद्र नेमाडे
ना. धों. महानोर
डॉ. के. बी. पाटील
पी. वी. राजगोपाल


प्रति,

**मा. मुख्याध्यापक / प्राचार्य**

सस्नेह नमस्कार,

कोरोना सारख्या आव्हांनाना यशस्वीपणे सामोरे जाण्याची क्षमता महात्मा गांधीजींच्या विचारधारेमध्येच आहे. याची प्रचिती आपण घेतली असेलच. समाजातील वाढीस लागलेली हिंसा व क्रुरता यावरील उत्तर ही गांधी विचारातच आहे. या विचारांचा प्रचार-प्रसार होऊन मानवी मुल्य विकसित व्हावी यासाठी आपण आपल्या गांधी विचार संस्कार परीक्षेचा पुन:श्च हरिओम करीत आहोत. आपल्या सर्वांच्या सहकार्याने यावर्षी जास्तीत जास्त विद्यार्थी परीक्षेस बसतील व शांततामय सहजीवनाचा विचार पेरण्याचा आपला उद्देश सफल होईल याची आम्हांस खात्री आहे.

गांधी रिसर्च फाउण्डेशन च्या माध्यमातून गांधी विचार संस्कार परीक्षा हा उपक्रम २००७ पासून राबविण्यात येत आहे. भारतातील सहा राज्यांसह विदेशातील सुमारे १८ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिलेली आहे. तर हजारो बंदीजनांनीही महात्मा गांधीजींच्या जीवनाचा अभ्यास केला आहे. कोरोना पश्चात आपण ही परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने घेण्याचे निश्चित केले आहे.

**महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक क्र. संकीर्ण २०१४/(२६/१४)/एसडी-६, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई दि. १२ जून २०१४** द्वारे सर्व शाळांनी गांधी रिसर्च फाउण्डेशनच्या गांधी विचार संस्कार परीक्षेत अधिकाधिक विद्यार्थ्यांना सहभागी करावे अशी सूचना केली आहे. या परीक्षेसाठी नाममात्र पुस्तक मूल्य घेतले जाते. या परीक्षेपासून कोणीही विद्यार्थी वंचित राहू नये यासाठी फाउण्डेशनने अत्यल्प आर्थिक उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांना हे पुस्तक शुल्क ही माफ केले आहे.

महात्मा गांधीजींची सत्य, अहिंसा व करुणा या मूल्यांच्या प्रति असलेली श्रद्धा व त्यांचे कार्य यांचा विचार करता आपणास नम्र विनंती की, आपल्या शाळा / महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना गांधी रिसर्च फाउण्डेशनच्या गांधी विचार संस्कार परीक्षेत सहभागी होण्याचे सूचित करावे जेणेकरून सत्य, अहिंसा, शांती व करुणा या मानवी मूल्यांचे संस्कार सर्वांवर होणे सहज शक्य होईल.

आपल्या सकारात्मक प्रतिसादाच्या अपेक्षेसह, कळावे.

आपला,

**उदय महाजन**
समन्वयक

डी. डॉ. लिगाडे / प्रा. पगार

SHIVJAGRUTI SR. COLLEGE OFFICE Nalegaon, Dist. Latur

25-11-21
PRINCIPAL
Shivjagruti Senior College
Nalegaon, Dist. Latur-413524

1579
05/11/2021

**सोबत** : १) परीक्षा माहितीपत्रक; २) प्रपत्र - अ, ब, क, ड आणि इ, ई; ३) शासनाचे परिपत्रक


**संपर्क** : कार्यालय - ०२५७-२२६००३३ / २२६४८०१, मोबाईल - ९४०४९५५२२६, ९४०४९५५२२०


*सत्य ही ईश्वर है। - मो. क. गांधी*


गांधी तीर्थ, जैन हिल्स, पोस्ट बॉक्स क्र. 118, जळगाव 425001 भारत. दूरध्वनी +91 257 2260033, फैक्स +91 257 2261133
ई-मेल-info@gandhifoundation.net • वेबसाईट-www.gandhifoundation.net, www.mkgandhi.org
CIN: U73200MH2007NPL169807

# महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण २०१४/(२६/१४)/एसडी -६
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा रोड , हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- १२ जून , २०१४.

प्रति,

१) शिक्षण संचालक,(माध्यमिक व उच्च माध्यमिक)
महाराष्ट्र राज्य ,
पुणे.

२)शिक्षण संचालक , (प्राथमिक ),
पुणे .

**विषय :-** गांधी विचार गांधी रिसर्च फाऊंडेशन मार्फत आयोजित गांधी विचार संस्कार परिक्षेस राज्यातील अधिकाधिक विद्यार्थ्यांना बसविण्यास प्रोत्साहित करणेबावत .

**संदर्भ :-** शासन परिपत्रक पीआरई-२००३/(३६३६)/प्राशि-१.

महोदय ,

गांधी रिसर्च फाऊंडेशन ,जळगांव (दुरध्वनी क्र.०२५७-२२६००३३/२२६०३८१) मार्फत दरवर्षी गांधी विचार संस्कार परिक्षेचे आयोजन केले जाते . सदर फाऊंडेशनने गांधी विचार संस्कार परिक्षेस राज्यातील अधिकाधिक विद्यार्थ्यांना बसविण्याबबत आवश्यक ती कार्यवाही करण्याची विनंती शासनास केली आहे .

त्या अनुषंगानेनमूद करण्यात येते की ., शासनाने संदर्भांकित परिपत्रकान्वये गांधीजींच्या विचारांचा विद्यार्थ्यांच्या भविष्यात उपयोग होईल या हेतूने त्यांच्या संबंधित उपक्रम राज्यातील शाळांमध्ये आयोजित करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत .

उपरोक्त पार्श्वभूमीवर गांधी रिसर्च फाऊंडेशन ,जळगांव यांनी केलेली विनंतीच्या अनुषंगाने सदर फाऊंडेशनच्या गांधी विचार संस्कार परिक्षेस राज्यातील शाळांमधील अधिकाधिक मुलांनी सहभाग घ्यावा या दृष्टीने आपण आपल्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना निदेश द्यावेत व तसेच याबाबत संबंधितांना परस्पर कळविण्यात यावे ही विनंती .

आपला विश्वासू

( श्री.ज.शास्त्री )
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

**सहपत्र** — अध्यक्ष , गांधी रिसर्च फाऊंडेशन , यांचे दि.२३ एप्रिल ,२०१४ चे पत्र .

**प्रत,** १) अध्यक्ष गांधी रिसर्च फाऊंडेशन , गांधी तीर्थ, जैन हिल्स पोस्ट बॉक्स क्र.११८, जळगांव ४२५००१ यांना माहितीस्तव .

३) मा.सचिव , शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,यांचे स्वीय सहाय्यक .

४) मा.आयुक्त , शिक्षण पुणे यांना माहितीस्तव .

Scanned with OKEN Scanner

गांधी रिसर्च फाउण्डेशन

# गांधी विचार संस्कार परीक्षा २०२१

## परीक्षेचे सर्वसाधारण माहितीपत्रक

१. **गांधी विचार संस्कार परीक्षेचे माध्यम मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती व कन्नड भाषेपैकी एक निवडता येईल.**

२. इ. ५ वी ते पदव्युत्तर अंतिम वर्षापर्यंतच्या विद्यार्थ्यांना तसेच शिक्षक व प्राध्यापकांनाही या परीक्षेत सहभागी होता येईल.

३. प्रत्येक इयत्तेसाठी महात्माजींच्या जीवनमूल्यांची ओळख करुन देणा-या विचारांवर आधारित अभ्यासक्रमाचे स्वतंत्र पुस्तक असेल.

४. परीक्षा ३० प्रश्नांची व ६० गुणांची बहुपर्यायी स्वरुपाची असेल.

५. विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी आवश्यक पुस्तके नाममात्र शुल्कात उपलब्ध.

६. आपल्या शाळा / महाविद्यालयात या परिक्षांचे आयोजन व व्यवस्थापन करण्यासाठी शिक्षक / प्राध्यापकाची (विद्यार्थी संख्येनुसार) 'परीक्षा समन्वयक' म्हणून नियुक्ती करावी.

७. **इयत्तानिहाय पुस्तकांचे नाव, भाषा व पुस्तक शुल्क पुढीलप्रमाणे राहतील -**

| इयत्ता | पुस्तकाचे नांव व भाषा | | | पुस्तक शुल्क |
|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | |
| ५ वी | गांधीजींच्या आठवणी | गाँधी बाबा | Our Bapu | ३०/- |
| ६ वी | चिरंतन प्रकाश देणारी ज्योत-महात्मा गांधी | गाँधीजी | Gandhiji | ३०/- |
| ७ वी | महात्मा गांधी-एक जीवन दर्शन | बापू मेरी माँ | Bapu My Mother | ३०/- |
| ८ वी | गांधीजींचे विद्यार्थीजीवन | गाँधी कथा | Gandhi Katha | ३०/- |
| ९ वी | गांधीजींचा विद्यार्थ्यांना संदेश | गाँधी गंगा | Gandhi Ganga | ३०/- |
| १० वी | एकादश व्रत दर्शन | गाँधीजी का जीवन उन्हींके शब्दों में | Gandhi's Life in His Own Words | ३०/- |
| ११ वी | राष्ट्रनिर्माता बापू | मंगल प्रभात | Mangal Prabhat | ४०/- |
| १२ वी | गांधी व्यक्तित्व | आरोग्य की कुँजी | Key to Health | ४०/- |
| प्रथम वर्ष | मोहन ते महात्मा | रचनात्मक कार्यक्रम | Constructive Programme | ४०/- |
| द्वितीय वर्ष | सत्याग्रही बापू | पंचायत राज | Panchayat Raj | ४०/- |
| तृतीय वर्ष | हिंद-स्वराज्य | हिन्द स्वराज | Hind Swaraj | ४०/- |
| चतुर्थ वर्ष | संक्षिप्त आत्मकथा | संक्षिप्त आत्मकथा | Gandhiji's Autobiography Abridgeo | ४०/- |
| पी.जी./डी.एड/बी.एड-१ | गांधीजींची चिरंतन तत्वे | - | - | ४०/- |
| पी.जी./डी.एड/बी.एड-२ | समज-गैरसमज | - | - | ४०/- |
| शिक्षक/प्राध्यापक | - | बुनियादी शिक्षा | - | ५०/- |

८. फाउण्डेशन तर्फे पुस्तके, प्रश्नपत्रिका, नमुना उत्तरपत्रिका आदी सर्व साहित्य एस. टी. पार्सल अथवा पोस्टाद्वारे पाठविण्यात येईल.

९. परीक्षा व्यवस्थापन, पोस्टेज व इतर अन्य बाबी यासाठी जो खर्च येतो त्यासाठी विद्यार्थ्यांकडून जमा झालेल्या एकूण पुस्तक शुल्कापैकी २० टक्के रक्कम समन्वयकाने स्वतःकडे राखून ठेवावी. उर्वरित ८० टक्के रक्कम फाऊंडेशनकडे पुढीलप्रमाणे पाठवू शकता. सोबतच्या प्रपत्र - अ व ब सह भरुन **दि. ३०-११-२०२१** पर्यंत पाठवावे.

Scanned with OKEN Scanner

१०. पुस्तक शुल्काची ८० टक्के रक्कम आपणांस **'गांधी रिसर्च फाउण्डेशन'** च्या खालील खात्यावर जमा करता येईल किंवा कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेतून आपण आमच्या ॲक्सीस बँक (AXIS Bank), जळगावच्या खात्यावर NEFT/RTGS करू शकता किंवा आपण भ्रमणध्वनी क्र. 9130036467 या नंबरवर BHIM ॲपद्वारा UPI ट्रान्सफर ही करु शकता अथवा GOOGLE PAY, PHONEPE, PAYTM, AMAZON PAY, MOBIKWIK आदी ॲप द्वारा खालील QR Code Scan करूनही पेमेंट करू शकता.

| | | | QR CODE |
|---|---|---|---|
| खातेदाराचे नांव | : | **गांधी रिसर्च फाउण्डेशन** | |
| बँक | : | **ॲक्सीस बँक** | |
| शाखा | : | **पटेल प्लाझा, जळगांव** | |
| खाते क्र. | : | **912010045398136;** | |
| IFSC Code | : | **UTIB0000174** | |

किंवा हे शक्य नसल्यास **'गांधी रिसर्च फाउण्डेशन, जळगाव'** या नावाने कोणत्याही **राष्ट्रीयकृत बँकेच्या डी. डी.** द्वारा पुस्तक शुल्क पाठविता येईल. बँक खात्यावर हे शुल्क जमा केल्यास किंवा NEFT/RTGS केल्यास भरणा पावतीची झेरॉक्स विद्यार्थ्यांच्या यादीसोबत पाठविणे अनिवार्य आहे. मोबाईलद्वारे पेमेंट केल्यास त्याचा स्क्रीनशॉट व्हाटसएप द्वारे पाठवावा. (**चेक स्वीकारला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**)

११. **अत्यल्प आर्थिक उत्पन्न गटातील विद्यार्थी असल्यास प्रपत्र ड व इ भरुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या (बीपीएल रेशनकार्ड/ अल्प उत्पन्नाचा दाखला किंवा शिक्षण अधिका-याने साक्षांकीत केलेली विद्यार्थी यादी) छायाप्रतीसह सोबतच पाठवावे.** सदर कागदपत्रांची पडताळणी केल्यावर पात्र विद्यार्थ्यांना परीक्षेचे साहित्य पाठविण्यात येईल. प्रपत्र - अ, ब व ड, इ ची एक झेरॉक्स प्रत समन्वयक शिक्षकांनी / प्राध्यापकांनी आपल्याकडे माहितीस्तव ठेवावी.

१२. शाळा/महाविद्यालयांनी परीक्षा **१५ जानेवारी २०२२** पूर्वी आयोजित करायच्या आहेत.

१३. परीक्षा ऑफलाईन (प्रत्यक्ष) व ऑनलाईन स्वरूपात आयोजित करण्यात येईल. त्याची प्रक्रिया खालील प्रमाणे असेल.

## ऑफलाईन (प्रत्यक्ष) परीक्षेची प्रक्रिया:

१. परीक्षा समन्वयकाने प्रपत्र अ, ब नुसार माहिती भरुन, पुस्तक शुल्क जमा करुन योग्य त्या माहितीसह फाउण्डेशनकडे पाठविणे.

२. आपणाकडून पुस्तक शुल्क, प्रपत्र अ व ब प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थी संख्येनुसार पुस्तके, प्रश्नपत्रिका व नमुना उत्तरपत्रिका एस. टी पार्सल / पोष्ट / कुरीअर द्वारा पाठविण्यात येतील.

३. आपणांस पुस्तके प्राप्त झाल्यानंतर ती पुस्तके विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी द्यावे व त्यांना वाचण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा. त्यानंतर आपल्या सोयीनुसार दि. १५ जानेवारी २०२२ पर्यंत परीक्षा आयोजित करावी.

४. परीक्षेनंतर लगेचच विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासून प्रत्येक इयत्तेतील प्रथम तीन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांची नावे, उत्तरपत्रिका तसेच सर्व उपस्थित विद्यार्थ्यांची गुण यादी (प्रपत्र-ई प्रमाणे) मुख्याध्यापकांच्या/प्राचार्यांच्या स्वाक्षरीने व विद्यार्थ्यांचा परीक्षा देतांनाचा फोटो दि. **२५ जानेवारी २०२२** पर्यंत फाउण्डेशनकडे पाठवावा. या परीक्षेची माहिती स्थानिक वृत्तपत्रात प्रकाशित झाल्यास सदर वृत्तपत्राचे कात्रण व परीक्षेसंबंधी आपल्या काही सुचना / अभिप्राय असल्यास फाउण्डेशनकडे पाठवावे.

## ऑनलाईन परीक्षेची प्रक्रिया:

१. परीक्षा समन्वयक शिक्षकाने ऑनलाईन परीक्षा देण्या-या विद्यार्थ्यांची माहिती (प्रपत्र अ) तसेच विद्यार्थ्यांच्या नावाची यादी इंग्रजीतून सोबत दिलेल्या प्रपत्रकाप्रमाणे (प्रपत्र-क) एक्सल फॉरमॅटमध्ये टाईप करुन ई-मेल ने गांधी रिसर्च फाउण्डेशनकडे पाठवायची आहे.

Scanned with OKEN Scanner

२. पुस्तक शुल्क व विद्यार्थ्यांची यादी (प्रपत्र अ व क) आम्हांस मिळाल्यानंतर परीक्षेची पुस्तके एस. टी पार्सल / पोष्ट / कुरीअर द्वारा शाळेच्या पत्यावर पाठविली जातील.

३. सदर पुस्तके विद्यार्थ्यांना देऊन त्यांना वाचण्यासाठी पुरेसा कालावधी द्यावा.

४. आपण पाठविलेल्या यादीतील विद्यार्थ्यांसाठी युजर नेम व पासवर्ड समन्वयक शिक्षकांना पाठविण्यात येईल. तो युजरनेम व पासवर्ड समन्वयक शिक्षकांनी विद्यार्थ्यांना द्यावयाचा आहे. त्याचाच वापर करुन विद्यार्थ्यांना सराव परीक्षा व मुख्य परीक्षा देता येईल.

५. परीक्षेच्या संभाव्य तारखा समन्वयक शिक्षकांनी प्रपत्र अ मध्ये दिलेल्या रकान्यात भरून पाठवायच्या आहे. (परीक्षेची तारीख **१५ जानेवारी २०२२** पर्यंत असावी.) त्या तारखांना सर्व्हरच्या उपलब्धतेनुसार परीक्षेची लिंक पाठविण्यात येईल. ती लिंक समन्वयक शिक्षकांनी विद्यार्थ्यांना देऊन परीक्षा घ्यावयाची आहे.

६. संभाव्य तारखेला जर सर्व्हर उपलब्ध नसेल तर आपणांशी चर्चा करुन तारीख ठरविण्यात येईल.

७. विद्यार्थ्यांने सर्व प्रश्न सोडवून झाल्यावर प्रश्नपत्रिका सबमिट करावी. त्यानंतर त्याला लगेच ऑनलाईन निकाल व प्रमाणपत्र प्राप्त होईल.

८. एकसमान गुण प्राप्त विद्यार्थ्यांमधून कमीत-कमी वेळात पेपर सबमिट करणा-या विद्यार्थ्यांला निवडले जाईल.

## निकाल प्रक्रिया:

१. जर एकाच शाळा / महाविद्यालयातून ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही स्वरुपातील विद्यार्थी परीक्षेला बसले असतील तर ऑफलाईन व ऑनलाईन परीक्षेत सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे गुण एकत्र करुन प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक निश्चित केले जातील.

२. सर्व शाळा / महाविद्यालयांकडून प्राप्त निकालांमधून प्रत्येक जिल्ह्यास्तरावर इयत्तानिहाय प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणा-या विद्यार्थ्यांना विशेष मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल. इतर सर्व विद्यार्थ्यांना सहभागाबद्दल प्रमाणपत्र, समन्वयक शिक्षक / प्राध्यापकांना सहकार्याबद्दल प्रशस्तीपत्र व सर्व शाळा / महाविद्यालयांना यशस्वी आयोजनाबद्दल सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येईल.

३. ऑफलाईन परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र पोस्टाद्वारे पाठविण्यात येतील.

४. ऑनलाईन परीक्षा देणारे विद्यार्थी पेपर सबमिट केल्यानंतर लगेच आपले प्रमाणपत्र ऑनलाईन डाऊनलोड करु शकतील.

५. **परीक्षेसाठीच्या महत्त्वाच्या तारखा:**

| | |
|---|---|
| प्रपत्र अ, ब, क आणि ड, इ गांधी रिसर्च फाउण्डेशनकडे पाठविण्याची अंतिम तारीख | ३० नोव्हेंबर २०२१ |
| परीक्षा आयोजित करण्याची अंतिम तारीख | १५ जानेवारी २०२२ पर्यंत |
| निकाल पाठविण्याची (प्रपत्र - ई भरुन) अंतिम तारीख | २५ जानेवारी २०२२ |
| अंतिम निकाल घोषित करण्याची तारीख | ३० जानेवारी २०२२ |

६. उपरोक्त नियम व सूचनांमध्ये बदल करण्याचा अधिकार गांधी रिसर्च फाउण्डेशनकडे राखीव असेल.

**अधिक माहितीसाठी संपर्क**

## गांधी रिसर्च फाउण्डेशन

गांधी तीर्थ, जैन हिल्स, शिरसोली रोड, पोस्ट बॉक्स नं.११८, जळगाव-४२५००१.
दूरध्वनी: ०२५७-२२६४८०१, २२६००३३, फॅक्स: ०२५७-२२६११३३; मो.: ०९४०४९५५२२६, ०९४०४९५५२२०
ई-मेल: gandhiexam@gandhifoundation.net; info@gandhifoundation.net;
संकेत स्थळ www.gandhifoundation.net

Scanned with OKEN Scanner